# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०३ दिनांक :- ~~१७/१२/२०२०~~ २३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ४८

विषय क्रमांक :- ०१

---

मागील विशेष सभा दि.१८/०८/२०२० रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२४ ते २५ आणि सर्वसाधारण सभा दि.१८/०९/२०२० रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२६ ते ४७ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. दि.१८/०९/२०२० रोजीचे कार्यवृत्तातील ठराव क्र.४६ मध्ये प्रभाग क्र.८ मधील स.नं.२४.६१ आर हा खुल्या भूखंड ऐवजी प्रभाग क्र.८ मधील स.नं.१० क्षेत्र २४.६१ आर हा खुला भूखंड अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच, दि.१६/०७/२०२० रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१७ मध्ये कलम १९ ऐवजी कलम ४९ प्रमाणे अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महासभा ठराव क्र.१९८ दिनांक ११/०३/२०२० अन्वये महानगरपालिकेच्या जागा भाडे देणेबाबत सदस्यांनी दिलेल्या उपसूचना रद्द करुन, सदर जागा ई-लिलाव पद्धतीने भाडेपट्टयाने देणेत याव्यात अशी दुरुस्ती करुन, सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- [signature] सौ. कामना कोळेकर. ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

अनुमोदक :- N.G.Naik. सौ. नसीम नाईक

महासभा निर्णय
स.स.न.४
स्थायी/प्रशासन

[signature]
महापालिका सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १७/१२/२०२०
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ५५

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२८/०९/२०२० रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका बांधकाम विभाग,सांगली कडील मुकादम कै.नंदकिशोर बाबू वाले यांचे कॅन्सर या आजाराने निधन झाल्याने, त्यांची वारस पत्नी श्रीमती वासंती नंदकिशोर वाले यांनी मागणी केलेनुसार कै.वाले यांचे कॅन्सर या आजारावरील औषधोपचारासाठी झालेल्या र.रु.३,६६,८६३/- मात्र खर्चाच्या ९०% प्रमाणे र.रु.३,०३,१७६/- मात्र पैकी र.रु.१,५०,०००/- मात्र अग्रीमधन रक्कम वजा जाता देय होणारी उर्वरित र.रु.१,५३,१७६/- मात्र मा.शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्रीमती वासंती नंदकिशोर वाले यांना अदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे.

अनुमोदक :- श्री. विनय बाडगे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ~~१७/१२/२०२०~~ २३/१२/२०२०

**ठराव क्रमांक :- ५६**

**विषय क्रमांक :- ०५**

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२८/०९/२०२० रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका पाणी पुरवठा विभाग,सांगली कडील कनिष्ठ लिपीक श्री.धोंडीराम दत्तात्रय उतळे यांचे ओठाचा कॅन्सर या आजारावरील औषधोपचारासाठी झालेल्या र.रु.५,२५,०३९/- मात्र खर्चाच्या ९०% प्रमाणे र.रु.४,७२,५३५/- मात्र पैकी र.रु.१,५०,०००/- मात्र अग्रीमधन रक्कम वजा जाता देय होणारी उर्वरित र.रु.३,२२,५३५/- मात्र मा.शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्री.धोंडीराम दत्तात्रय उतळे यांना अदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- श्री. विजय घाडगे.

अनुमोदक :- श्री. पांडुरंग कोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १७/१२/२०२०
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ५७

विषय क्रमांक :- ०६

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२८/०९/२०२० रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका पाणी पुरवठा विभाग,सांगली कडील पंप ऑपरेटर कै.शशिकांत अंकुश साबळे यांचे कॅन्सर या आजाराने निधन झाल्याने, त्यांची वारस पत्नी श्रीमती कल्पना शशिकांत साबळे यांनी मागणी केलेनुसार कै.साबळे यांचे कॅन्सर या आजारावरील औषधोपचारासाठी झालेल्या र.रु.४,२५,९४४/- मात्र खर्चाच्या ९०% प्रमाणे र.रु.३,८३,३५०/- मात्र मा.शासन निर्णयातील तरतुदीनुसार श्रीमती कल्पना शशिकांत साबळे यांना अदा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- श्री.विजय धाडगे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.पांडुरंग कोरे. महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ~~१७/१२/२०२०~~
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ५८

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०८/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज गेस्ट हाऊस, इदगाहनगर ते एस.टी.वर्कशॉप ते हनुमान मंदिर या १०० फुटी रस्त्यास स्वर्गीय खासदार हिंदरत्न प्रकाशबापू पाटील असे नामकरण करणेकामी सुचना व हरकती मागणविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सुचना व हरकती प्राप्त न झाल्याने, मिरज गेस्ट हाऊस, इदगाहनगर ते एस.टी.वर्कशॉप ते हनुमान मंदिर या १०० फुटी रस्त्यास स्वर्गीय खासदार हिंदरत्न प्रकाशबापू पाटील असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री: अतहर नायकवडी. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री: विजय घाडगे.

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३**

दिनांक :- ~~१७/१२/२०२०~~
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ५६

विषय क्रमांक :- ०८

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१४/०७/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मराठा समाजातील विद्यार्थी वसतीगृहाकरीता आण्णाबुवा शॉपिंग सेंटर मिरज येथील पहिल्या मजल्यावरील १० खोल्या व मिरज शाळा क्र.२ क्षेत्र २२१.२४ चौ.मी. या जागांचे एकत्रित सहा.संचालक नगररचना यांनी ठरवून दिलेले वार्षिक भाडे र.रु.११,०५,७२३/- + GST व इतर कर या प्रमाणे सहा महिन्याचे भाडे सिक्युरिटी डिपॉझीट व एक वर्षाचे भाडे आगाऊ घेवून, दरवर्षी १०% भाडेवाढ करणेसह महापालिकेच्या अटी शर्तीच्या अधीन राहून प्रथमत: ९ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. आनंदा देवमाने.

अनुमोदक :- श्री. पांडुरंग कोरे.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महासभा ठराव क्र.५६

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ~~१७/१२/२०२०~~
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६०

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/१०/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज येथील सि.स.नं.१०२४७ अ मधील जागेमध्ये २० के.एल.ऑक्सिजन प्लॅन्ट बसविणेसाठी सिनर्जी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,मिरज यांना सहा.संचालक यांनी ११ महिन्याकरीता र.रु.२,२३,०००/- इतके भाडे ठरवून दिलेनुसार ११ महिने मुदतीने भाड्याने देणेस मान्यता देणेबाबतच्या विषयावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील सि.स.नं.१०२४७ अ मधील जागेमध्ये २० के.एल.ऑक्सिजन प्लॅन्ट बसविणेसाठी सिनर्जी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,मिरज यांना जागा दिलेपासूनचे सर्व भाडे प्रशासनाने तात्काळ वसुल करावे व सदरचा प्लॅन्ट तात्काळ काढून घेणेत यावा असे ही सभा आदेशित करीत असून, भविष्यात अशा जागा भाडेपट्टयाने देणेच्या असल्यास, त्या जाहिर ई-लिलाव पद्धतीने देणेत याव्यात असे ही सभा सूचित करीत आहे.

सूचक :- सौ.कल्पना कोळेकर.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- श्री.विनय धाडगे.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १७/१२/२०२०
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६१

विषय क्रमांक :- १०

---

सोबतचे उपायुक्त (कार्यशाळा विभाग) यांचे दि.०३/११/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

१४ वा वित्त आयोगामधून घनकचरा व्यवस्थापनासाठी नविन वाहने खरेदी करणेसाठी मान्यता देणेबाबत सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१४ व्या वित्त आयोगातून महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी विषयपत्रातील नमुद १० प्रकारची २५ नविन वाहने GEM पोर्टलवरुन तसेच, GEM पोर्टलवर उपलब्ध नसणारी वाहने www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर निविदा प्रसिद्ध करुन, निविदा दर मागविणेस व त्याकामी येणारे र.रु.११,४०,००,७८८/- मात्रच्या खर्चास तसेच, बीएस ६ मुळे वाढणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

मा.शासनाकडून १४ वा वित्त आयोगातून घनकचरा व्यवस्थापनासाठी वाहन खरेदीसाठी मान्यता मिळाली असून, सदर वाहने खरेदी करताना बी. एस.६ प्रकारची (मॉडेलची) वाहने खरेदी करीत असताना येणारा जादा खर्च १४ वा वित्त आयोगातून करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, समडोळी कचरा डेपोवरील कचऱ्याविषयी लोकप्रतिनिधी व नागरिक यांच्या तक्रारी वाढल्या असून, घनकचरा निर्मुलनसाठी मशिनरी www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर निविदा प्रसिद्ध करुन, निविदा दर मागविणेस ही सभा मान्यता देत असून, सदर वाहने व मशिनरी खरेदी केल्यामुळे त्यासाठी लागणारा मनुष्यबळाचा (वाहन चालक,मेकॅनिक,हेल्पर,वेल्डर,मदतनीस) इत्यादी कर्मचाऱ्यांचा खर्च हा १४ वा वित्त आयोग व १५ वित्त आयोग मधील उपलब्ध रक्कमेतून करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर वाहने व मशिनरी खरेदी करताना खरेदी करणेत येणारी वाहने व मशिनरी दर्जेदार व चांगल्या प्रतीची खरेदी व्हावी यासाठी निविदा प्रक्रियेमध्ये सहाभागी होणाऱ्या कंपन्या / डिलर हे यापूर्वी व सद्या काळ्या यादीत नसलेची खातरजमा प्रशासनाने करुन घ्यावी असे ही सभा सूचित करीत आहे.

तसेच, सदर मशिनरीसाठी व वाहनासाठी लागणारे मनुष्यबळ व वाहन चालक हे मागील भरतीतील प्रतिक्षा यादी मधून घेवू नयेत. या मनुष्यबळासाठी १४ व्या व १५ व्या वित्त आयोगातून खर्च करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- [signature] पांडुरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] आनंदा देवमाने

[signature]

[signature]
महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १७/१२/२०२०
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६२

विषय क्रमांक :- ११

---

**सोबतचे कर निर्धारक व संकलक यांचे दि.०४/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.**

मा.शासनाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मा.बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीला मालमत्ता करमाफी योजना लागू केली असून, सदर योजना सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रामध्ये दि.०९ सप्टेंबर २०२० च्या शासन निर्णयानुसार लागू केलेला आहे. त्यास ही सभा सहमती दर्शवित असून, प्रस्तुतचा विषय अवलोकनी घेवून ही सभा परत पाठवित आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील मिळकत धारकांना आकारणेत येत असलेल्या उपयोगीता कराबाबत नागरिकांचे मध्ये असंतोष निर्माण झालेला असून, सदरचा कर भरणेबाबत नागरिकांमध्ये उदासिनता असून, सदरच्या कर आकारणीमध्ये शिथीलता यावी व उपयोगीता कर आकारणी ही नागरिकांच्या मिळकतीचे स्वरुप व मिळकतीचे आकारमान यावर निश्चित व्हावे असे या सभेचे मत असलेने, प्रशासनाने उपयोगीता कर खालील प्रमाणे सुधारीत करुन सुधारीत दराने कर वसुली करणेस मान्यता मिळणेसाठी मा.शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

| अ.क्र. | एकत्रित मालमत्ता कर रुपयात | उपयोगिता कर (प्रति महिना) |
|---|---|---|
| १. | रु.५००/- पर्यत घरपट्टी धारकास | रुपये शुन्य |
| २. | रु.५००/- ते १०००/- | रु.१०/- |
| ३. | रु.१०००/- ते २०००/- | रु.२०/- |
| ४. | रु.२०००/- ते ३०००/- | रु.४०/- |
| ५. | रु.३०००/- ते ४०००/- | रु.५०/- |
| ६. | रु.४००० ते ५०००/- | रु.६०/- |
| ७. | रु.५०००/-च्या वर | रु.१००/- |

सूचक :- सौ. कल्पना कोळेकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- N.G.Naik सौ. नसीम नाईक.

महापौर,

# <u>सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका</u>

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- <u>१७/१२/२०२०</u>

२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६३

विषय क्रमांक :- १२

---

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.०८/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

प्रभाग समिती क्र.३ अंतर्गत वॉर्ड क्र.८ व २ या शामनगर (चाणक्य चौक) ते पालवी हॉटेल रस्ता इत्यादी परिसराचे आणि प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत वॉर्ड क्र.१९ मधील वानलेसवाडी,कुंभारमळा, रामनगर व गव्हर्मेंट कॉलनी पूर्व भाग इत्यादी परिसराचे पाणी व्यवस्थेसाठी दोन टाक्या बांधणे अनुशंगिक कामगिरी करणेसाठी चालू मजीप्रा दरसूची प्रमाणे अनुक्रमे रु.१,७०,१७,०००/- आणि रु.१,६०,६८,०००/- अशा एकूण अंदाजित र.रु ३,३०,८५,०००/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये रितसर जाहिर निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-महाटेंडर पद्धतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफाराशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- (सही) सौ.कामना कोळेकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (सही) श्री.पांडुरंग कोरे. (सही) महापौर,

पाणीपुरवठा अभियंता

(सही)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १७/१२/२०२०
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६४

विषय क्रमांक :- १३

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग, कुपवाड) यांचे दि.०८/१२/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

कुपवाड स.नं.१९४ अ/१ मधील मंजूर विकास योजना नुसार कायम झालेले आरक्षण क्र.३३३ प्रायमरी स्कुल व आरक्षण क्र.३३८ प्ले ग्राऊंड मधील गुंठेवारी प्रस्तावांचे नियमितीकरण करणेबाबत व सदर आरक्षणाचे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल होवून रहिवास विभागात समाविष्ठ करणेबाबत फेरबदल प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणेस मान्यता देणेकामी प्राप्त विषयावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सदरचे आरक्षण हे कलम ३० (१) अन्वये रहिवास करणेबाबत यापुर्वी मा.शासनास सादर करणेत आले होते. परंतु, दि.०४/०४/२०१२ रोजी सदर आरक्षण पुन्हा कायम करणेत आलेले आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- श्री.पांडुरंग कोरे. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.आनंदा देवमाने.

महापौर,

प.स.न.र

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १७/१२/२०२०

२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६५

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या वर्षा अमर निंबाळकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील TVS पोरेज शोरुम समोर स्व.मदनभाऊ पाटील यांचे स्मारक उभारणेत आले आहे. परंतु, सदर ठिकाणच्या चौकास कोणतेही विशिष्ट ओळख नसल्यामुळे सदरच्या चौकास नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिकांची मागणी होत असून, सदर परिसरामध्ये स्व.मदनभाऊ पाटील यांचे स्मारक असल्यामुळे सदर चौकास स्व.मदनभाऊ पाटील स्मारक चौक असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयास अनुसरुन सन्मा.सदस्या सौ.रोहिणी सत्यजीत पाटील यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली विश्रामबाग येथील क्रांतिसिंह नाना पाटील चौक ते स्वामी विवेकानंद चौक या मार्गावरील नविन उड्डाण पुलास संत शिरोमणी श्री.गाडगे बाबा महाराज असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Nimbalkar सौ.वर्षा निंबाळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.फिरोज पठाण.

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १७/१२/२०२०

२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६६

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य सागर रामचंद्र घोडके यांनी दिलेला प्रस्ताव व उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.११/१२/२०२० चे विषयपत्र स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील गर्व्हमेंट कॉलनी मधील राज्य कर्मचारी सोसायटी मधील स.नं.५०१७,५०१८ येथे परिसरातील नागरिकांसाठी सुसज्ज असे उद्यान विकसीत केले आहे. सदर उद्यानामध्ये लहान मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी,जेष्ठ नागरिकांसाठी वॉकिंग ट्रॅक इ.सुविधा निर्माण केल्या आहेत. सदर परिसरातील नागरिकांचे मागणीनुसार मनपाकडून विकसीत केलेल्या उद्यानास सांगलीचे पालकमंत्री मा.नाम.जयंतराव पाटील साहेब यांच्या मातोश्री कै.कुसुमताई राजाराम पाटील उद्यान असे नामकरण करणेस ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.सागर घोडके. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.मैनुद्दीन बागवान महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १७/१२/२०२०
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज वॉर्ड क्र.६ मधील सौदागर गल्ली येथील स.नं.४६७४ मधील महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर सांस्कृतिक हॉल बांधणेत आले आहे. सदर सांस्कृतिक हॉलचा वापर सदर परिसरातील नागरिक विविध सामाजिक कामासाठी करणार असून, सदर सांस्कृतिक हॉलचे कै.महंमद उर्फ बावा बाबालाल काझी उर्फ बावा असे नामकरण करणेबाबत मागणी करीत आहेत. कै.महंमद बाबालाल काझी उर्फ बावा हे तत्कालीन नगरपालिका तसेच महानगरपालिकेचे माजी नगरसेवक होते. यांच्या कार्याची आठवण म्हणून सदर सांस्कृतिक हॉलला नागरिकांच्या मागणीनुसार कै.महंमद बाबालाल काझी उर्फ बावा यांचे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विष्णू माने.

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३**

दिनांक :- १७/१२/२०२०
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६९

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

देशातील विविध खेळ प्रकारांना चालना मिळावी व अधिकाधीक गुणवंत खेळाडू देशात निर्माण व्हावेत यासाठी राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना केंद्र शासनाकडून विविध पुरस्कार दिले जातात. यामध्ये विविध राज्यातील खेळाडूंचा समावेश असतो. त्यामुळे ज्या राज्यातील खेळाडूंना असे पुरस्कार प्रदान होतात. त्या राज्यांच्याहीनावलौकीकामध्ये भर पडते. त्या अनुषंगाने आपल्या महाराष्ट्रातून असे गुणवंत खेळाडू निर्माण व्हावेत यासाठी राज्य शासनाने शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्काराची निर्मिती करुन प्रतीवर्षी विविध खेळ प्रकारातील गुणवंत खेळाडूंना हा पुरस्कार प्रदान केला जातो. सदर खेळाडूंचे योगदान लक्षात घेवून, या खेळाडूंना पुरस्कारापुरते गृहीत न धरता त्यांना विविध शासकीय सेवेमध्ये सामावून घेणेचा शासन निर्णय ही पारित केला आहे. त्या अनुषंगाने सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये महापालिका क्षेत्रातील शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार विजेत्या खेळाडूंना मनपा सेवेमध्ये सामावून घेतलेले आहे. त्या अनुसरुन महानगरपालिका क्षेत्रातील सायकलिंग या खेळ प्रकारातील शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार २०१६-१७ विजेता खेळाडू श्री.शाहीदअहमद शब्बीर जमादार रा.रज्जाक गॅरेज समोर, स्टार बॅटरी मागे, काळे प्लॉट, १०० फुटी रोड,सांगली यास सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये कायम सेवेत सामावून घेणेस निर्णय घेणेकामी आलेल्या प्रस्तावाचे कामी प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. आनंदा देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. पांडुरंग कोरे

महापौर,

[illegible] सचिव

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- ~~१७/१२/२०२०~~
२३/१२/२०२०

ठराव क्रमांक :- ६१

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका स्थापन झालेपासून महासभेने आरक्षित वॉर्डातील सदस्यांची समाजकल्याण समिती मध्ये निवड केलेली होती ती समिती मागासवर्गीय भागात विविध विकास कामे करत असते.

कोरोना काळामध्ये मा.आयुक्त साहेबांनी फक्त समाजकल्याण समितीचे सर्व स्टाफची इतर विभागात बदली केली त्यामुळे समाजकल्याण समितीचे अस्तीत्व जवळजवळ संपल्यासारखे आहे. सद्या स्टाफ नसलेमुळे समितीचे कामकाज करताना अनेक अडचणी येत आहेत. तरी समाजकल्याण समितीचा स्टाफ पुर्वी असलेप्रमाणे नियुक्त करुन मिळावे त्यामुळे काम करणे सोयीस्कर होईल. तरी संबधित अधिकाऱ्यांना आदेश होणेस निर्णय घेणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहात झाले चर्चेनुसार समाजकल्याण समितीसाठी आवश्यक असणारा स्टाफ देणेसाठी प्रशासनाने सत्वर कार्यवाही ठेवावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. आनंदा देवमाने. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. संजय मोहिते. महापौर,

प्रशासनास पुढील कार्यवाहीसाठी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका